MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात



## नियुक्ती रद्द

अंकुश बाबुराव गवळी यांची वडवणी तालुका प्रतिनिधी म्हणून नियुक्ती रद्द करण्यात आली आहे त्यांना सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ कार्यालयामधून त्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे याची सर्व वाचक जाहिरातदार बातमीदार यांनी नोंद घ्यावी.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष –०१ अंक –३४४ गुरूवार दि.०५ सप्टेंबर २०२४ आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -344 THURSDAY DT.05 SEPTEMBER 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

## मुस्लिम समाजाचे मते चालतात, पण मुस्लिम समाजाबद्दल असलेला दृष्टीकोन बदलायला खासदार साहेब तयार नाहीत?

# खासदार बजरंग सोनवणेची स्टंटबाजी उघड

## मुस्लिम वस्त्यांमध्ये घाणीचं साम्राज्य म्हणून जाणं टाळलं?

**नालीच्या पाण्यामध्ये अक्षरशा सोफियान मणियार नावाचा तरुण झोपला होता खासदार त्या ठिकाणी आले आणि फोटोसेशन करू लागले प्रशासनालाही फोन करू लागले परंतु नगर परिषद सिओअसेल किंवा कलेक्टर यांनी मात्र त्यांचा फोन उचलला नाही आणि बजरंग सोनवणे सांगतात की माझं प्रशासन ऐकत नाही मग मुस्लिम समाजाने तुमच्यावरती उपकार केलेले आहेत मताच्या मोठी एक वोट बँक असलेल्या मुस्लिम समाजाचा मता पुरता वापर आहे का बजरंग सोनवणे यांनी त्या ठिकाणी आल्याबरोबर त्या मुस्लिम समाजाच्या तरुणाला नालीच्या पाण्यामध्ये झोपला असताना उठविणे गरजेचे होते.परंतु त्याचे आरोग्य धोक्यात घालून बजरंग सोनवणे यांनी स्वतःचा राजकीय स्टंट केल्याची चर्चा बीड जिल्ह्यामध्ये सध्या जोर धरू लागली आहे.खासदार बजरंग सोनवणे नालीच्या पाण्यामध्ये झोपलेल्या तरुणापाशी उभा राहून फोटो काढले परंतु त्या तरुणाला आल्याबरोबर का त्या नालीच्या पाण्यातून उठून उभा राहण्यासाठी सांगितले नाही किंवा उठवले नाही तो तरुण जर उद्याच्याला आजारी पडला तर त्याच्या परिवाराची व त्याची काळजी घ्यायला खासदार बजरंग सोनवणे येतील का असाही सवाल यावेळी बीड जिल्ह्यातील जनतेच्या तोंडून प्रश्न उपस्थित केला आहे तर जनतेकडून सुद्धा या बातमीला म्हणजे चर्चेला उधाण आलेले आहे त्यामुळे खासदार बजरंग सोनवणे यांनी मुस्लिम समाजाचा वापर करणे आता तरी बंद करावे.**





- खासदार बजरंग सोनवणेनी मुस्लिम समाजाचे उपकाराची परतफेड करण्यासाठी स्वखर्च व खासदार फंड मुस्लिमांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत.?
- बजरंग सोनवणेसह अनेक जणांना व्हायचं होतं तेलगाव नाका चौकातील आंदोलनात हिरो?
- नाळवंडीच्या रस्त्याला निधी मागण्यासाठी गेलेल्या तरुणाला पंतरवाळी आहेत का म्हणणाऱ्या खासदारांनी मुस्लिम समाजातील रस्ता नालीच्या प्रश्नाला का हजेरी लावली याचे उत्तर ही जनतेला द्यावे?
- मुस्लिम समाजाच्या अनेक वस्त्यांमध्ये घरामध्ये पाणी शिरलं होतं त्या ठिकाणी खासदार बजरंग सोनवणेनी जाऊन पाहणी करणे गरजेचे होतं परंतु खासदार बजरंग सोनवणे नव्हे तर कोणताच नेता त्या ठिकाणी का गेला नाही? हिम्मत असेल तर खासदार बजरंग सोनवणेनी बीड शहरातील दहा मुस्लिम वस्त्यातील कामं स्वखर्चातून करावे किंवा स्वतःच्या खासदार फंडातून करावे.?
- बजरंग सोनवणे चा फोन कलेक्टरने उचलला नाही ना सीओने उचलला नाही खासदार बजरंग सोनवणे स्वतःच्या तोंडानेच सांगू लागले माझा फोन उचलायनात ते?
- खासदार बजरंग सोनवणे ची दु तोंडी भूमिका मुस्लिम समाजाच्या वस्त्यांमध्ये जाऊन पाहणी करायला का टाळले याचे उत्तर त्यांनी द्यावे?
- खासदार बजरंग सोनवणे म्हणजे फुसका बार प्रशासनाला धारेवर आधारित स्वतः जनतेसमोर सांगत आहेत प्रशासन माझ ऐकत नाही म्हणून?
- बीडच्या मुस्लिम समाजाच्या वस्त्यांमध्ये खासदार बजरंग सोनवणेनी जाणं टाळलं कारण त्या ठिकाणी घाणच घाण असते नको असं बाप्पा बोलले म्हणून चर्चा?

पेठ बीड प्रतिनिधी (जावेद पठाण)

बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी मात्र आता कहर केला आहे बीडच्या राजकारणाला दुजोरा देण्यासाठी व जातीयवाद संपुष्टात यावा यासाठी बीड लोकसभेमध्ये दलित मुस्लिमांनी बजरंग सोनवणे ला निवडून दिले खरे परंतु या ठिकाणी बजरंग सोनवणे हे स्वतःच्या खर्चातून स्वतःच्या खासदार फंडातून किमान एक ते दहा गल्ल्या गोळा मधील नाली रस्ते करून देतील का? असाही प्रश्न यावे जनतेला पडलेला आहे परंतु खासदार बजरंग सोनवणे बीडच्या एका तेलगाव नाका चौकातील आंदोलनामध्ये आले त्या ठिकाणी नालीच्या पाण्यामध्ये झोपलेल्या तरुणासोबत फोटोसेशन केले व त्या ठिकाणावरून बोलबच्चन करत निघून गेले परंतु खासदार बजरंग सोनवणे यांनी मुस्लिम समाजाच्या भावना दुखावणाऱ्या नितेश राणे बद्दल प्रतिक्रिया का दिल्या नाहीत तर मुस्लिम वस्त्यांमध्ये खूप घाण असते रे बाबा नको मला म्हणत त्या ठिकाणी जाण्या अगोदरच भागवतावर यांनी आंदोलकांना सांगितले होते की मी गल्लीबोळातील वस्त्यांमध्ये जाणार नाही त्या ठिकाणी घाणीचा साम्राज्य असतं तर अनेकांच्या घरामध्ये पाणी गेलं होतं संसार उपयोगी वस्तू ह्या पूर्ण पाण्याने खराब झाल्या होत्या खासदार बजरंग सोनवणेनी त्यांना संसार उपयोगी साहित्य का दिले नाही व त्या ठिकाणी जाऊन पाहणी का केली नाही बीडचा खासदार हा थापाड्या निघाला अशी चर्चा सध्या मुस्लिम बांधवांमध्ये ऐकायला मिळत आहे.

मुस्लिम समाजाच्या भावना दुखावणाऱ्या नितेश राणेच्या विरोधामध्ये आंदोलन चालू असतानाही आंदोलन भरकटण्यासाठी कालची आंदोलन होते अशीही चर्चा या आंदोलनाच्या ठिकाणी न जाणाऱ्या मुस्लिम बांधवांनी बोलून दाखवले तर यावेळी मात्र खासदार बजरंग सोनवणे यांनी नितेश राणे यांच्या भाषणा विषयी मुस्लिम समाजासमोर आपली भूमिका का माडली नाही तर यावेळी जातीयवाद पेठवणाऱ्या सत्ताधाऱ्यांना मुस्लिम समाजाचे फक्त मतदान पाहिजे आणि मुस्लिम समाजाचा कोण उपयोग व वापर करून घेतो हे मुस्लिम समाजातील जनतेने आता तरी ओळखलं पाहिजे लोकसभेच्या निवडणुकीमध्ये असेल किंवा या अगोदरच्या विधानसभा नगरपरिषदेच्या निवडणुकीमध्ये मुस्लिम समाजाच्या मताचा वापर झालेला आहे परंतु आता तरी मुस्लिम बांधवांनी येणाऱ्या काळामध्ये निर्णय भूमिका घेऊन आपली मतदान योग्य व्यक्तीला करावे

# डॉ.योगेश क्षीरसागरांनी केली नुकसानग्रस्त शेतीची पाहणी

बीड ।प्रतिनिधी

**तालुक्यातील नागापूर खुर्द, मोरगाव येथील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतीची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी गुरुवारी (दि.५) बांधावर जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी नुकसानीचे पंचनामे करण्याच्या सूचना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना दिल्या. नागापूर खुर्द, मोरगाव यासह बीड विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये अतिवृष्टीमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.**

या नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे केली आहे. मोरगाव येथील जाधव वस्ती परिसरात शिवाजी येडे, लाला पाटील चौरे, महादेव खोसे, बालासाहेब जाधव, अच्युत रसाळ, चव्हाण, वैजनाथ जाधव, रामराव जाधव, समीर शेख, शहादेव खोसे, भारत जाधव, सर्जेराव जाधव, अतुल जाधव, नंदू जायभाये, बाळू धोंगडे, सुनील कागदे, विष्णू मेंगडे, नितीन चौरे यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती. तसेच, नागापूर खुर्द येथे पाहणीदरम्यान हनुमान साळुंके, श्रवर्मा साळुंके, वसंत साळुंके, हनुमान लव्हाळे, राहुल साळुंके, दत्ता साळुंके, गोकुळ साळुंके, सतीश साळुंके, मसुराम सोळुंके, राहुल साळुंके यांच्यासह शेतकरी, नागरिकांची उपस्थिती होती.



# पाटोद्यात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट मोठी दुर्घटना होण्याआधीच नगरपंचायतने कुत्र्यांचा बंदोबस्त करावा

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदयात मोकाट कुत्र्यांचा प्रचंड सुळसुळाट याला रोखणार कोण? मान्य आहे की,मुक्या प्राण्यांनाही जीवन जगण्याचा अधिकार आहे. पण शहरामध्ये भटक्या कुत्र्यांच्या हल्यात लहान मुले गंभीर जखमी झाले आहेत आपण टिव्हीवर बातम्या मध्ये पाहत असतोत असेच आपल्या पाटोदा शहरात ही मोठी दुर्घटना घडू शकते कारण पाटोदा शहरात चौका चौकात २० ते ३० भडक्या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी बसलेली असतात ते कुत्रे शाळकरी मुलं-मुली,पहाटे फिरायला जाणारे जेष्ठ नागरिक, महिलां,रात्री अपरात्री येणारे प्रवासी यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करतात यामुळे मोकाट कुत्र्यांचा उच्छाद आणि दहशत लोकांच्या मनात भीती निर्माण झाली आसुन यावर पाटोदा



नगरपंचायत लक्ष देत नसल्याने नागरिकांनी कोणाला दाद मागावी? जाब कोणाला विचारावा? आणि याचा बंदोबस्त कोण करणार? हा प्रश्न पाटोदा शहरातील नागरिकांना सतावत आसुन पाटोदा शहरात फिरासते कुत्र्यांची संख्या प्रचंड वाढली असल्यामुळे रस्त्यावर प्रवास करणारे लहान मुले मुली नागरीक जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत यामुळे पाटोदा नगरपंचायतने लवकरात लवकर मोकार फिरस्त्या कुत्र्यांचा बंदोबस्त करून शहरातील नागरिकांना भयमुक्त करावे

# दुर्दैवी घटना ;पोलिस भरतीचे अपार कष्ट करुन स्वप्न उराशी बाळगले अखेर काळाचा घाला झाला खाकीचे स्वप्न कायमचे अधुरे राहिले

## आष्टीची आंतरराष्ट्रीय कब्बडी खेळाडू आरती नागरे चा डंम्पर ने पाठीमागून दिलेल्या धडकेत जागीच मृत्यू तालुक्यात शोककळा


खराडीच्या चंदननगर परिसरात दर्गा येथे दुचाकी डंम्परचा अपघात

पुणे पोलिस चालक शहर परिक्षेचा आज दि.४ रोजी लेखी पेपर होता

आष्टी (सुरेश कांबळे)

तालुक्यातील रुटी येथील १९ वर्षीय तरुणीने पोलीस भरतीचे स्वप्न उराशी बाळगून प्रयत्न करत होती. यासाठी नियमित ग्राउंड , अभ्यास करायची या बरोबरच आंतरराष्ट्रीय कब्बडी खेळाडू देखील होती पोलिस भरतीचा बुधवारी पेपर पुणे येथे असल्याने परीक्षेसाठी गेलेल्या आरती नागरे च्या दुचाकीला पुणे विमानतळ पोलिस ठाणे हद्दीतील नगर रस्त्यावरील दर्गा येथे डंम्पर ने पाठीमागून जोराची धडक दिली यामध्ये आरतीचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी दि.३ सप्टेंबर रोजी घडली अपार कष्ट मेहनत करून उराशी बाळगलेले खाकीच स्वप्न अखेर आरतीच अधुर राहिले काळाचा घाला झाला अन अपघातात जिव गमावला गेला या दुर्दैवी घटनेने तालुक्यात शोककळा पसरली आहे.

तालुक्यातील रुटी येथील आरती पांडुरंग नागरे १९ वर्षीय तरुणीने पोलिस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून दररोज नित्यनेमाने ग्राऊंड अभ्यास आष्टी शहरात करत होती.पोलिस होण्यासाठी जिवाची परिकाष्टा करुन मेहनत घेतली अभ्यास केला मागिल वर्षीच्या भरतीत वेटींगला आरती होती यावर्षी तीने पुणे पोलिस ग्रामीणची मैदानी चाचणी ५० पैकी ४७ गुण मिळवले होते तर संभाजी नगर कारागृह पोलिस पेपर देऊन पुणे पोलिस चालक शहर च्या मैदानी चाचणीत ५० पैकी ५० गुण मिळवले



तर आज दि.४ सप्टेंबर रोजी लेखी परीक्षा होती यासाठी पुणे येथे गेलेली आष्टीची तरुणी आरती नागरे नातेवाईकांच्या स्कुटीवरून जात असताना खराडीच्या चंदननगर परिसरात दर्गा येथे नगर रस्त्यावर वाघोली वरून पुण्याच्या दिशेने खडी घेऊन डंम्पर निघाला होता.दर्गा परिसरात आल्यावर चालकाचे नियंत्रण सुटले आरती नागरे च्या दुचाकीला पाठीमागून धडक दिली यामध्ये आरती नागरे चा जागीच मृत्यू झाला हि घटना ३ सप्टेंबर रोजी घडली मात्र या घटनेमुळे आरतीच पोलिस भरतीच स्वप्न कायमचे अधुरे राहिले आरतीने अपार कष्ट आणि मेहनतीच्या बळावर एक उत्कृष्ट कबड्डीपटू म्हणून नाव कमावले अवघ्या १९ वर्षाच्या आरतीने २ वेळा महाराष्ट्राच्या कुमार संघाचे नेतृत्व केले, तसेच खेलो इंडियामध्ये महाष्ट्राच्या संघाला विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला होता मात्र या दुर्दैवी घटनेने तालुक्यात शोककळा पसरली असून मध्यरात्री १.३० च्या सुमारास रुटी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले तालुक्यात शोककळा पसरली आहे.

उराशी पोलीस भरतीचे स्वप्न बाळगून ती पुणे येथे गेली होती. आरतीने पोलीस भरतीसाठी खुप मेहनत घेतली होती आरतीने पोलीस भरती मध्ये ५० पैकी ४७ चे ग्राउंड मारलं होतं.काल मंगळवारी परीक्षेला जात असताना तिचे अपघाताने दुर्दैवी अपघाती निधन झाल्याची वार्ता कळाली आणि आष्टी तालुक्यातील जनतेचे मन सुन्न झाले.आरतीच्या जाण्याने नागरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.मी नागरे कुटुंबाच्या दुखात सहभागी आहे.ईश्वर त्यांना सावरण्याचे बळ देवो भावपूर्ण श्रद्धांजली आरती

- मा.आ.सुरेश धस

मा.आ.भिमराव धोंडे कडून नागरे कुटुंबाच्या घरी जाऊन सांत्वन

अपार कष्ट करून पोलिस होण्यासाठी जिद्द जिकाटीने मेहनत करून मैदानी चाचणी होऊन लेखी परीक्षेसाठी गेलेल्या आरती नागरे चा अपघाती मृत्यू झाल्याची बातमी कळली आष्टी तालुका वासीयांना मन सुन्न करणारी घटना घडली आरती आंतरराष्ट्रीय कब्बडी खेळाडू होती तिच्या जाण्याने क्रिडा क्षेत्राची मोठी हानी झाली असून नागरे कुटुंबाच्या दुखात मी सहभागी असून नागरे कुटुंबीयांना सावण्याची ईश्वर शक्ती देवो भावपूर्ण श्रद्धांजली आरती

- मा.आ.भिमराव धोंडे

# बंद पथदिव्या सह इतर मागण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांना काँग्रेस घालणार घेराव-नारायण होके

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव शहरातील नगर परिषदेवर प्रशासक आल्यापासून शहरांमध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत माजलगाव शहराची सध्या बकाल अवस्था झाली असून याला सर्वस्वी जबाबदार नगर परिषद प्रशासन असल्याचे काँग्रेस तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे निवेदनात ते पुढे म्हणाले कि.

नगर परिषदेवर बॉडी अस्तित्वात असताना आ.सोळंके हे आढावा घेण्याच्या नावाखाली पंधरा दिवसाला न.प.मध्ये येऊन विकास कामांचा निधीवर मनमानी करता यावी म्हणून निधी सा.बांधकाम विभागाला वर्ग करून व तसा ठराव घेण्याच्या सूचना नगरसेवकांना देत होते परंतू प्रशासक आल्यापासून शहरांमध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या असताना आ.महोयदयांना मात्र न.प.येऊन आढावा घेयला वेळ नाही

मुख्याधिकारी कार्यालयात थांबत नसल्यामुळे. इतर कर्मचारी लहान लहान कामांसाठी सामान्य नागरिकांना हेलपाटे मारायला लावत असून यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणीनां सामोरे जावे लागत आहे तसेच दोण दिवसांवर गणेशोत्सव सारखा मोठा सन आला आहे तरी शहरातील मेन रोड सह सर्वच भागातील पथ दिवे बंद आहेत हानुमाण मंदिरा समोर रस्त्यावरच भाजीपाला विक्रेते बसत असल्यामुळें वाहतूकीस मोठी अडचण निर्माण होऊन याचा नाहक त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे,मेन रोडवर मोकाट जनावरामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आठवडी बाजाराचे भिजत घोंगडे तसेच आहे या सह अनेक प्रश्नांवर मुख्याधिकारी यांना काँग्रेस पक्षाच्या वतीने घेराव घालून जबाब विचारणार असल्याचा इशारा काँग्रेस तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील शहराध्यक्ष अफरोज तांबोळी दत्ता कांबळे शेख



जानुशा शेख अहेमद गणेश चोरमले विनोद सुरवसे नेहाला इनामदार यांनी दिला



डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया युवक तालुका उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल

# फळरोप वाटिका व तालुका बिजगुणणकेंद्र माजलगांव येथील मंजुरांच्या थकीत वेतन तात्काळ द्या- गणेश थोरात

माजलगाव ।प्रतिनिधी

येथील फलरोप वाटिका व तालुकाबीजगुणन केंद्र माजलगाव येथील मजुरांचे थकीत वेतन तात्काळ देण्यात यावे नसता आयुक्त कृषी आयुक्त कार्यालया पुणे समोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा गणेश थोरात व बाबासाहेब पवार यांनी येथील उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनातुन दिला आहे गणेश गंगाधरराव थोरात , बाबासाहेब मारोती पवार व तुकाराम कोंडीबा निसर्गंध यांनी दि २८ ऑगस्ट २०२४ रोजी मा. आयुक्त (कृषी) कृषी आयुक्तालय साखर संकुल परिसर शिवाजी नगर पुणे -५ यांना कृषी अधिकारी कृषि चिकीत्सालय फळरोप वाटिका व तालुका बिजगुणणकेंद्र माजलगांव यांच्या मार्फत निवेदन दिले आहे त्यात म्हंटले आहे की येथील दैनदिन मजुराचे सन २०२२- २३ मधील प्रलंबीत (कालबाह्य) देयके व तसेच माहे - फेब्रुवारी २०२४ पासूनची प्रलंबीत देयके इत्यादी प्रलंबीत असल्याने ऐन सणासुदीला मजुरावर उपासमारीची वेळ आलेली आहे. तसेच कार्यालयाकडे अनुदान उपलब्ध असताना सुध्दा मजुराचे वेतन



अदा करण्यात आलेले नाही. कारण रेग्युलर कृषी अधिकारी नसल्याने मजुराचे वेतन अदा करण्यास आडचणी येत आहेत. वरिल कार्यालयाने रेग्युलर अधिकारी किंवा तात्पुरतया स्वरुपाचे अधिकारी नियुक्त करुन आम्हा मजुराचे सणा-सुदिच्या अगोदर वेतन अदा करण्यात यावे हि नम्र विनंती. वेतन अदा न केल्यास दि २० सप्टेंबर २०२४ च्या नंतर आपल्या कार्यालयाकडे आमरण उपोषणास कधीही केव्हाही बसु त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलया कार्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी असं दिलेल्या निवेदनात गणेश थोरात , बाळासाहेब पवार व तुकाराम कोंडीबा निसर्गंध यांनी म्हंटले आहे

# देशी, विदेशी दारूचा साठ्यासह पावणे सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

## देशी, विदेशी दारूचा साठ्यासह पावणे सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील दौलावडगांव येथील एका हॉटेल समोर उभा असलेल्या लाल रंगाच्या कारमध्ये देशी, विदेशी दारूसह कार असा पावणे सहा लाखांचा मुद्देमाल स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडला असल्याची घटना सायंकाळच्या दरम्यान घडली. या प्रकरणी एकाला कारसह ताब्यात घेण्यात आले असून अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील दौलावडगांव येथे ४ सप्टेंबर रोजी हॉटेल शंभूराजे समोर लाल रंगाच्या कारमध्ये देशी,



विदेशी दारू असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला समजाताच त्यानी याठिकाणी धाड टाकली असता कारमध्ये १७ हजार ६५० रूपयाची देशी, विदेशी दारू आढळून आली. भरत मोहन चोबे वय ३५ वर्ष रा. आंबेवाडी ता. आष्टी यासह साडेपाच लाखाची कार व दहा हजाराचा मोबाईल असा एकूण ५ लाख ७७ हजार ६५० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलिस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, दिपक खांडेकर, अर्जुन यादव, नामदेव उगले यांनी केली. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# माजलगाव शहरात दलालांचा सुरसुराट



**दलालांच्या भूलथापांना बळी पडू नका : इम्रान कादरी**

## मौलाना आजाद अर्थिक विकास महामंडळाच्या नावाखाली पैश्याची लूट

माजलगाव ।प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्रभरात मौलाना आजाद विकास आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून व्यावसायिक, शैक्षणिक व इतर कर्ज देण्यात येत असून यासाठी जिल्यातील कार्यालयात अर्ज करावा लागतो परंतू काही दलाल हे लाभार्थ्यांना भूलथापा मारून व चुकीची माहिती देऊन त्यांची आर्थिक फसवणूक करीत असल्याने अश्या दलालांच्या भूलथापांना बळी न पडता थेट जिल्हा कार्यालयात येऊन व्यवस्थापक इम्रान कादरी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन इम्रान कादरी यांनी वृत्त पत्राच्या माध्यमातून केले आहे.

बीड जिल्ह्यात अशी लूटमार अनेक ठिकाणी होत आहे परंतु माजलगाव तालुक्यात जास्त प्रमाणात ह्या दलालाचा सुरसुराट असून माझी वर ओढखं आहे, मी फाइल करून देतो, पैसे भरण्याची गरज नाही, आम्ही पैसे माफ करतो त्यासाठी वेगळे फिस लागतील, परंतु आपल्या पी. टी. आर किव्हा सात बारा यावर आपण हे कर्ज घेतो व त्यावर हा बोजा पडलेला असतो आणि हे पैसे कधीही माफ होत नसून भरावेत लागतात परंतु ह्या दलालांनी आपला फाइल भरण्यापासून तर मंजूर होईपर्यंत व त्यानंतरही हे दलाल सामान्य माणसाची लूट करतात आणि यामुळे त्यांनी आपला भावफळक तय्यार केलेला असून अनेक प्रकारची खोटी आश्वासने देणून सर्वसामान्य व गरजू लाभार्थ्यांची सर्रासपणे आर्थिक लूट करीत आहे. तरी बीड जिल्ह्यातील अश्या दलालांच्या भुलथापाला माजलगाव व जिल्ह्यातील जनतेने बळी न थेट जिल्हा कार्यालयात येऊन संपर्क साधावा असे आवाहन इम्रान कादरी यांनी केले आहे

मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडळात अर्ज दाखल करण्यासाठी कोणत्याही प्रकारची फिस आकारली जात नाही. कोणत्याही दलालच्या आमिषाला बळी न पद्धत थेट कार्यालयात येऊन जिल्ह्या व्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधावा

# शिक्षक दिनानिमित्त एकताच्या वतीने होणार राज्यस्तरीय रौप्य महोत्सवी ऑनलाईन काव्य संमेलन

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित २५ वे (रौप्यमहोत्सवी) राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलन भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या जयंतीनिमित्त दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न होणार असल्याची माहिती एकता कोअर कमिटीने दिली असून या काव्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी परभणी येथील लेखक ह.भ.प.प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये आणि उद्घाटकपदी अंबाजोगाई येथील जेष्ठ साहित्यिक मा.राजेंद्र रापतवार यांची निवड करण्यात आल्याचे एकताच्या पदाधिकाऱ्यांनी प्रसिद्धी माध्यमांसमोर जाहीर केले.

फाउंडेशनच्या माध्यमातून सहा एकता मराठी राज्यस्तरीय साहित्य संमेलनांचे आयोजन, अनेकदा वृक्षारोपण, रक्तदान शिबीरे, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना अन्नधान्य व साडीचोळीची मदत, होतकरू गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, निराधार, अनाथांना अन्नधान्याची मदत, राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार प्रदान सोहळा, जीवनगौरव, आदर्श शिक्षक, आदर्श सामाजिक कार्यकर्ता, आदर्श पत्रकार, आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार वितरण समारंभ, आंतरराष्ट्रीय कालाकारांची जुगलबंदी कार्यक्रम, कोजागिरी काव्य मैफिल, मातृदिन काव्य सप्ताह, उन्हाळी बाल-कुमार संस्कार शिबीर, राज्यस्तरीय व विभागीय कार्यकर्ता शिबीर आणि काव्य संमेलन, थोर महापुरुष, वंदनीय राष्ट्रीय नेते, हुतात्मे, क्रांतिकारक, दिवंगत साहित्यिक यांच्या जयंती पुण्यतिथी, शिव-चित्र व भीम-चरित्र स्पर्धा, एकता महाराष्ट्र वक्ता राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, ग्रंथालय लोकार्पण, पुस्तक प्रकाशन, सांस्कृतिक कार्यक्रम यासारखे उपक्रम अनेक वर्षांपासून राबविण्यात येतात. गेल्या वर्षांपासून एकताच्या वतीने राज्यस्तरीय ऑनलाईन काव्य संमेलनांचे आयोजनही करण्यात येत असून या ऑनलाईन संमेलनातील रौप्य महोत्सवी काव्य संमेलन बुधवारी पार पडणार आहे. या संमेलनात तुळजापूर येथील साहित्यिक तथा पाठ्यक्रमातील कवी शंकर अभिमान कसबे, गझलकार श्रीराम गिरी (बीड), माजलगावच्या कवयित्री गौरी देशमुख, कवयित्री अर्चना स्वामी (अंबाजोगाई), जुन्नर येथील कवी विलास हाडवळे, कवयित्री सुरेखा कानडे (पुणे), पाटोदा जि.बीड येथील कवयित्री सुरेखा खेडकर हे निमंत्रित मान्यवर सहभागी होणार आहेत. परळी वैजीनाथ येथील कवीवर्य अनंत मुंडे हे या काव्य संमेलनाचे सूत्रसंचालन करतील. एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य चे प्रवक्ता मल्हारी खेडकर यांची प्रस्तावना व एकताचे बीड जिल्हा प्रतिनिधी प्रा.महारूद्र डोंगरे यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता होईल. या काव्य संमेलनाचा रसिक श्रोत्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन एकताचे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड, मार्गदर्शक प्रा.डॉ.भास्कर बडे, सचिव पत्रकार गोकुळ पवार, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, उपाध्यक्ष नितीन कैतके व मिरा दगडखैर, सहसचिव लखुळ मुळे, एकताच्या सल्लागार ड.भाग्यश्री ढाकणे, महिला आघाडी प्रमुख रंजना फुंदे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ.सचिन सानप, कैलास तुपे, राजेश बीडकर, माही शेख, दिपक महाले, डॉ.शोभा सानप, रंजना डोळे, शोभा राजळे, लता बडे, हरिप्रसाद गाडेकर, पो.कॉ.ज्ञानेश्वर पोकळे, महादेव राऊत, फौजी कैलास खेडकर, महेश नागरे, प्रदेश संघटक देवीदास शिंदे, एकता लेखक आघाडी प्रदेश सचिव दिनकर जोशी, लेखक आघाडी प्रदेश संघटक किरण भावसार, प्रदेश युवक निमंत्रक इम्रान शेख, मराठवाडा विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, विभागीय सचिव अंबादास केदार, महिला आघाडी विभागीय अध्यक्षा प्रा.डॉ.संगीता घुगे, विभागीय संघटक पत्रकार राजा पुजारी, विभागीय युवक आघाडी संघटक ह.भ.प.सुनील महाराज केकाण, एकता पत्रकार आघाडीचे संतोष तांबे, बाळासाहेब कोठुळे, प्रशांत बाफना, बिभीषण चाटे, अशोक भांडेकर, उत्तम बोडखे, अंगद पानसंबळ, भिमराव उल्हारे, शहाबाज पठाण, सज्जन शेळके यांसह विविध जिल्हा कार्यकारिणी, तालुका कार्यकारिणीतील पदाधिकारी आणि सभासद, कार्यकर्त्यांनी केले आहे.




# जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेमध्ये पोद्दार इंग्रजी शाळा बीड़ने प्रथम क्रमांक पटकावला

बीड ।प्रतिनिधी

बीड येथे जिल्हास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेच्या सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते यास्पर्धेतील सामने १४ वर्षाखालील मुले, १७ वर्षाखालील मुले, १७ वर्षाखालील मुली असे तीन वयोगटात होते हे सामने दि. ४ सप्टेंबर रोजी सकाळी ९:३० वाजता सुरु करण्यात आले होते १७ वर्षाखालील मुलांच्या सिंगल व डबल दोन्ही खेळामध्ये पोद्दार इंटरनेशनल इंग्रजी शाळा बीडचे विद्यार्थी शेख अबुज़र सलीम सुधांशु चव्हाण

कौशल देशमुख सुमित पाठक वेदांत कुड़के यांनी प्रथम क्रमांक पटकावला त्यांना शाळा मित्रमंडळ व नातेवाईकांकडून अभिनन्दन व शुभेच्छा देण्यात आल्या शेख अबुज़र सुधांशु चव्हाण कौशल देशमुख सुमित पाठक वेदांत कुड़के या सर्व विद्यार्थीची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे या सर्वांना कोच मार्गदर्शक म्हणून आदित्य ससाने श्रीकांत ढोले हर्ष कुकडेजा यांनी सहकार्य केले पोद्दार इंटरनेशनल इंग्रजी शाळा बीडच्या विद्यार्थी प्रथम आल्याने व त्यांच्या विजयाने व विभागीय निवड़ीने सर्वस्तरातुन अभिनन्दनाचा वर्षाव होत आहे.

### शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत देण्यात यावी बीड पालकमंत्री तथा

# महाराष्ट्र राज्याचे कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे यांना निवेदन माधवतात्या निर्मळ

धारूर ।प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदार संघातील सर्वच गावात दोन तीन दिवसात झालेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या सोयाबीन, मूग, उडीद, कापूस, भाजीपाला या पिकांचे अतोनात नुकसान झालेले आहे.शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची पहाणी करून त्यांना शासनाकडून तात्काळ विनाअटी शर्ती घालता मदत देण्यासाठी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे कृषीमंत्री मा.धनंजयपंडितरावमुंडे यांना निवेदन देवून



शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी माजलगाव विधानसभा मतदार संघांचे नेते मा.माधव तात्या निर्मळ यांनी केली. यावेळी मा. जिल्हा परिषद सभापती कल्याण भाऊ आबुज, सरपंच भालचंद्र सोळंके गंगामसला, श्रीकृष्ण काका सोळंके, मा. नगराध्यक्ष दीपकराव मुंडे, भाजप नेते ईश्वर आप्पा खुरपे, कल्याणराव शेप, शहरउपाध्यक्ष बाळासाहेब क्षिरसागर, सरपंच शिवाजीराव काळे,रंजीत रुपनर, मा सरपंच विठ्ठल सोळंके,अतुल सोळंके,प्रदीप सोळंके यांच्या सह मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

### जिल्हा प्रशासनाने तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत करावी;

# अनिलदादा जगताप यांच्या सूचना!

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यात सर्वत्रच दोन दिवस मुसळधार पावसाने थैमान घातले असल्याने लाखो शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. सोयाबिन, तूर, मुग, उडीद, कापूस इत्यादी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच शहरासह ग्रामीण भागातील अनेक लोकांच्या घरात पाणी शिरल्याने त्यांची घरे पडली असून संसार उघड्यावर आला आहे. काहींच्या दुकानात आणि घरात पाणी शिरल्याने अनेक मौल्यवान वस्तू खराब झाल्या आहेत. तसेच अनेक ठिकाणी मूकी जनावरे वाहून गेली आहेत. उभी पिके वाहून गेली असल्याने हाता तोंडाला आलेला घास हिरावला गेला आहे. जमिनी खरडून गेल्याने पावसाचा मोठा फटका बसला आहे. तसेच अनेक ठिकाणी दोन गावांना जोडणारा नदी नाल्यावरील पूल वाहून गेल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. जिल्हाप्रशासनाने तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत करावी असे आवाहान शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड जिल्हाधिकारी यांना पत्रकाद्वारे केले आहे.



याबरोबरच बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे भूस्खलनाचा होण्याचा धोका आहे. सदरील गावात ८० ते ८५ कुटुंबे असून ५०० ते ६०० लोक सध्या त्याठिकाणी वास्तव्यास आहेत. या गावाची रचना, वरच्या बाजूला डोंगर व खालच्या बाजूला नदी आणि मधोमध गाव अशाप्रकारची आहे. त्यामुळे तेथे भूस्खलन होण्याचा धोका सातत्याने जाणवत आहे. या गावातील लोकांचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने या गावाचे पुनवर्सन करण्यात यावे .तसेच बीड शहरानजीक असलेले बिंदुसरा धरण पूर्ण क्षमतेने भरून वाहत असल्याने बीड शहरातील नदीकाठच्या नागरिकांना, व्यापाऱ्यांना नगरपालिकेच्या वतीने सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. याबाबत देखील जिल्हा प्रशासनाने उपयोजना कराव्यात. शहरातील अनेक भागांमध्ये स्वच्छतेअभावी नागरिकांच्या राहत्या घरामध्ये पाणी शिरले आहे. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून दैनंदिन जीवन, आरोग्य तसेच इतर प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत. याबाबत नगरपालिकेच्या वतीने नाली स्वच्छता करून नागरिकांना रस्ते व सोयीसुविधा देण्यासाठी यंत्रणेला आदेशित करावे अशा विविध सूचना शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिल्या आहेत.

## अतिवृष्टीमुळे हवालदिल झालेल्या बळीराजाला शंभर टक्के नुकसानभरपाई सह कर्जमाफी करा – गणेश बजगुडे पाटील

बीड ।प्रतिनिधी

मागील काही दिवसांपासून बीड जिल्हा व तालुक्यातील सर्वच महसुल मंडळात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झालेली असताना बीड तालुक्यात २४ तासाहून अधिक काळ सततचा मुसळधार पाऊस झालेला असुन शेतकऱ्यांच्या जमिनीत पाणीच पाणी झाल्यामुळे उभे पीक व शेती देखील वाहून गेलेली आहे. सणासुदीच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या खरिपाच्या सर्वच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असताना प्रशासनाने पांचनाम्याच्या नावावर वेळकाढूपणाची भुमिका नघेता सरसकट १०० टक्के नुकसान भरपाई सह कर्जमुक्ती करावी व हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना विनाआट विनाविलंब मदत करण्यात यावी. त्याच बरोबर सोयाबीन कापुस दरवाढ, पीकविमा रक्कम तत्काळ मिळाली पाहिजे



अश्या मागणीचे निवेदन आज बीड तालुका काँग्रेस कमिटी व शिवक्रांती युवा परिषदेच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांना देण्यात आले. यानिवेदणावर तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील, इंटकचे जिल्हाध्यक्ष रमधन जमाले, सखाराम बेडगे, हनुमान घोडके आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# केज येथे पाटलांच्या घोंगडी बैठकीस लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा !

### विधानसभा पार्श्वभूमीवर ८ सप्टेंबर रोजी बैठक – रोहन गलांडे पाटील

केज ।प्रतिनिधी

विस्वाघातकी सरकार सगेसोयरे कायदाची अंमलबजावणी करत नाही व आपल्या मराठा आरक्षणावर कुठलाही ठोस निर्णय घेत नाही.आपले मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने दि.८सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता आंतरवाली केज येथे आपल्या मराठ्याचे दैवत मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत मराठा आरक्षण जनजागृती निमित्त घोंगडी बैठक आयोजित केली केली आहे तरी अखंड मराठा समाज, केज तालुक्यातील मराठा बांधवांनी मराठा आरक्षण जनजागृती घोंगडी बैठकीस लाखोंच्या करोडोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील समर्थक व सकल मराठा समाज केज तालुका व समाज बांधव रोहन गलांडे पाटील यांनी केले आहे. आपल्या लेकरांच्या न्याय हक्कासाठी दि. ८ सप्टेंबर २०२४ रोजी ठिक सायंकाळी ४ वा. मराठा आरक्षण जनजागृती घोंगडीमहाबैठक आयोजित केली आहे तरी केज तालुक्यातील सकल मराठा समाज बांधवांनी आपल्या प्रत्येक गावातुन कमीत कमी पाच गाड्या जिप,पीकप, स्कारपीओ आशा चार चाकी दोन चाकी गाड्या तरी घेऊन मराठा आरक्षण जनजागृती घोंगडी महाबैठक केज येथे उपस्थित रहावे व आपली काळजी घेण्यासाठी पाऊसाळ्याचे दिवस असल्याने पाऊसा पासुन बचाव करण्यासाठी रेन कोट इतर साहित्य पाऊसा पासुन बचाव करण्यासाठी सोयीनुसार आपली सोय आपल्या गाडी सोबत करायची आहे व मराठा आरक्षण जनजागृती घोंगडी महाबैठकीस लाखोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सकल मराठा समाज केज ,सामाजिक कार्यकर्ते रोहन गलांडे पाटील यांनी केले आहे . तरी केज तालुक्यातील आमरण उपोषणकर्ते, साखळी उपोषणकर्ते, मराठा सेवक, स्वयंसेवक, सभा आयोजक-नियोजक, डॉक्टर, वकील, अभ्यासक, शेतकरी, कष्टकरी आणि सर्व मराठा बांधव, येणाऱ्या विधानसभा धरतीवर मराठा आरक्षण जनजागृती घोंगडीमहाबैठक संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत मराठा आरक्षण जनजागृती निमित्त घोंगडी बैठक रविवार दि.८ सप्टेंबर २०२४ वेळ: सायं. ४ वा. ठिकाण: मुक्ताई फंक्शन हॉल, केज आयोजक: सकल मराठा समाज, केज मतदार यांनी आयोजित केली आहे तरी सकल मराठा समाज केज तालुका मराठा बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सकल मराठा समाज केज तालुका बांधवांनी व सामाजिक कार्यकर्ते रोहन गलांडे यांनी केले आहे.



# चौसाळा येथे गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मुलींना स्वरक्षणाचे मार्गदर्शन

चौसाळा ।प्रतिनिधी

गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चौसाळा या ठिकाणी महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या परिपत्रकानुसार शाळेमध्ये सखी सावित्री समितीची स्थापना करण्यात आली या समितीचे सचिव मा. मुख्याध्यापक श्री श्रीमंतराव चौधरी सर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थीसुरक्षा चर्चा सत्राचेआयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शालेय समिती सदस्य संभाजी (आबा) जोगदंड व चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक (बाबा) कुचेकर यांनी स्थान भूषविले. शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री केदार सर घोडके सर ,मोठे सर ,वैद्य सर, गुरव सर लिमकर सर मंचावर उपस्थित होते या समितीच्या महिला सदस्य श्रीमती साबणे जयमाला यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की मुलींनी आपल्या शाळेमध्ये साजऱ्या केल्या जाणाऱ्या ऐतिहासिक स्त्रिया समाजसेविका देशभक्त क्रांतिकारक स्त्रियांच्या जयंत्या आणि पुण्यतिथी याच्या तून काही प्रेरणा घेतली पाहिजे अनेक स्त्रियांनी स्व संरक्षणाबरोबरच देश रक्षणाचं कार्य केलं आहे. मग त्या अहिल्याबाई होळकर असतील ,झाशीची राणी लक्ष्मीबाई असतील, महाराणी ताराबाई असतील अशा विरांगणा वारसा आपल्याला लाभलेला आहे .त्याचा वसा आपण घेतला पाहिजे संकटाच्या वेळी डोक्यावरचा पदर डोळ्याला लावून रडत बसण्यापेक्षा तोच पदर कमरेला खोचून पुरुषप्रधान संस्कृतीमधील वासनांधतेला ठेचून काढलं पाहिजे स्त्रीने आज प्रत्येक क्षेत्रामध्ये पुरुषाच्या बरोबरीने नव्हे तर एक पाऊल पुढे जाऊन आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे मग ते आरोग्य क्षेत्र ,संरक्षण क्षेत्र ,अंतराळ क्षेत्र असो, उद्योग क्षेत्र असो की ,व्यापार असो प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे म्हणून तुम्ही मुलींनी तुमच्यातील न्यूनगंड बाजूला सारून आत्मनिर्भर झालं पाहिजे. स्वतःचं आत्मरक्षण आणि आत्मपरीक्षण स्वतः केलं पाहिजे कोणत्याही आमिषाला भूलथापांना बळी न पडता सतर्क आणि सावध



असलं पाहिजे. मोबाईल इंटरनेट हे सर्व मायाजाळ आहे. याचे खूप दुष्परिणाम पाहायला मिळतात त्यामुळे त्यातील जे चांगलं ज्ञान आहे ते आपण घेतलं पाहिजे. तसेच साबणे मॅडम यां मुलींना असे म्हणाल्या की मुली आता कुठेही सुरक्षित नाहीत .एखाद्यावर विश्वास टाकून मुलींनी एकटे कोणाबरोबरही जाऊ नये ,समाजात सगळेच लोक वाईट नसतात समाजात स्त्रियांचा आदर व सन्मान करणारे लोक सुद्धा आहेत अशावेळी मुलींना चांगला वाईट स्पर्श ओळखता आला पाहिजे कुठलीही गोष्ट शिक्षकापासून आई-वडिलांपासून लपवून ठेवू नये जेणेकरून पुढील एखादा वाईट प्रसंग टाळता येईल मुलींनी आता स्वरक्षणाची जबाबदारी स्वतः घ्यायला हवी प्रत्येक वेळी आपल्याबरोबर पालक असतीलच असे नाही प्रत्येक मुलींना कराट्याच्या शिक्षणाची आवश्यकता आहे चांगल्या शिक्षणाबरोबर आपले आरोग्य सुद्धा चांगले ठेवले पाहिजे. स्वहित जपता आले पाहिजे एखाद्या वाईट प्रसंगा नंतर प्रत्येकाला त्यातून उभे राहता आलं पाहिजे आपल्या रक्षणाची जबाबदारी आता आपणच घेतली पाहिजे आपल्या जवळ आता पावडर लिपस्टिकच्या ऐवजी आपल्या पर्समध्ये मिरची पूड स्प्रे आणखी शिवरायांसारखी वाघ नखे जवळ बाळगण्याची गरज आहे अशा प्रकारे श्रीमती साबणे मॅडम यांनी आपल्या अमोघ वाणीतून परखड शब्दात सर्व मुलींमध्ये एक नवचेतना निर्माण केली आणि शेवटी इतनी शक्ती हमे देना दाता श्र मन का विश्वास कमजोर हो ना श्र हे गीत विद्यार्थ्यांनी गायले व या गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आपल्या खुमाशदार शैलीत श्री राठोड सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी टाचतोडेबाई, विश्वनाथ पवार ,धनंजय वाघमारे ,संजय सोनवणे , व पवार बाई यांनी मोलाचे सहकार्य केले.



लोणी सय्यमीर तालुका आष्टी जिल्हा बीड येथे येणाऱ्या गणेश उत्सवाचे शांतता कमिटीची बैठक घेऊन कार्यकर्त्यांना सूचना देण्यात आला यावेळी अंभोरा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे व गावातील पदाधिकारी उपस्थित होते छायाचित्र सुरेश कांबळे

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पहाडी पारगाव शाळेची दोन वर्षांपूर्वीच एक वर्ग खोली ढासळली

### आता तिन वर्गाच्या खोल्या ढासळल्या आणखी तिन वर्ग धोकादायक



## वरिष्ट कार्यलयास वारंवार लेखी ,तोंडी सांगूनही दुर्लक्ष केले

**किल्लेधारूर ।प्रतिनिधी**

**किल्लेधारूर तालुक्यातील जिल्हापरिषद प्राथमिक शाळा पहाडी पारगाव शाळेच्या तिन वर्गाच्या खोल्या मागील दोन दिवसात झालेल्या जोरदार पावसाने २सप्टेंबर रोजी रात्री ढासळून गेल्या. या खोल्या रात्रीच्या वेळी ढासळल्याने फार मोठा अनर्थ टळला .एका वर्गात तिस चाळीस विद्यार्थी आसतात दिवसा ही घटना घडली असती तर फार मोठा अनर्थ घडला असता.**

वारंवार वरिष्ट कार्यालयास शाळेचे मुख्याध्यापक साखरे सर यांनी या शाळेच्या खोल्या पडण्याच्या मार्गावर आहे आसे कळवले होते.ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच यांनी ग्रामपंचायत सभेत ठराव घेउन शाळेचे नवीन बांधकाम करावे असे ठराव वरिष्ट कार्यालयास पाठवले होते.वरिष्ठ कार्यालयाच्या बेजबाबदरापणा मुळे मोठा अनर्थ घडला असता वरिष्ठांच्या या भोंगळ कारभारामुळे ग्रामस्थ संताप व्यक्त करत आहेत.सर्व शिक्षा अभियानचे इंजिनियर यांनी आणखी तिन खोल्या गळत असून स्लब कधीही पडु शकतो असा निष्कर्ष नोंदवीला असून त्या खोल्यात वर्ग भरवू नयेत असे शिक्षकांना सांगीतले आहे.केंद्र प्रमुख दत्ता घोळवे यांनी शाळेस भेट देऊन लवकरच प्रश्न मिटवण्यासाठी कार्यवाही करु असे सांगितले आहे. सरपंच व उपसरपंच यांनी ग्रामपंचायत कार्यालय शाळेसाठी खुले केले असून हनुमान मंदीरातही कांही वर्ग भरवण्याची व्यवस्था केली आहे.शाळेचे बांधकाम लवकरात लवकर करून विद्यार्थ्यांची होणी परवड थांबवावी अशी मागणी सरपंच सौ सोनाली अंडील,उपसरपंच हनुमंत (बप्पा) मुंडे ,ग्रामपंचायत सदस्य तसेच समस्त गावकरी यांनी केली आहे.

# मौजे भीम नगर तालुका वडवणी जिल्हा बीड येथे बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनास उदंड प्रतिसाद

संपूर्ण देशामध्ये भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने वर्षावासाचे कार्यक्रम सुरू आहेत.. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये तथागत भगवान गौतम बुद्धाने ,एकाच ठिकाणी बसून बौद्ध धर्माचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी भिक्खू ना मार्गदर्शन केले. हे भिखु तथागतांचे प्रवचन तीन महिन्याच्या काळामध्ये काळजीपूर्वक ऐकत होते.. आपल्या हृदयामध्ये आणि बुद्धीमध्ये त्याची साठवणूक करीत होते. हे भिखू तीन महिन्याच्या नंतर चारही दिसेलां तथागतांच्या आदेशाप्रमाणे धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी गावोगावी फिरत होते ..त्यामुळे बौद्ध तत्त्वज्ञानाला आणि बौद्ध धम्माला प्रचंड प्रमाणामध्ये गती प्राप्त झाली होती.. संपूर्ण भारत बौद्धमय तथागताने केलेला होता. सर्व जनता आनंदामध्ये आणि समाधानाने जीवन जगत होती.. अशा या बौद्ध धम्माच तत्त्वज्ञान महामानव बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आत्मसात केले ..आणि १४ ऑक्टोबर १९५६ स*** भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून बौद्ध धम्माची दीक्षा घेतली ..बौद्ध धम्माची दीक्षा घेताना बाबासाहेब आंबेडकरांची व्यापक अशा पद्धतीची संकल्पना होती ..परंतु दीक्षा घेतल्यानंतर अवघ्या काही महिन्यांमध्येच महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले... आणि बौद्ध धम्म प्रचार आणि प्रसाराला फार मोठी खीळ बसली ...परंतु त्यांचे सुपुत्र भैयासाहेब आंबेडकर यांनी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे महान कार्य हाती घेतलं ..चैत्यभूमीची निर्मिती केली.. बौद्धाचार्यांची निर्मिती केली ..आणि संपूर्ण



भारतभर बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार फार मोठ्या प्रमाणात करायला सुरुवात केली.. कालांतराने सूर्यपुत्र भैयासाहेब आंबेडकर यांचे निर्माण झालं . पुन्हा एकदा धम्माची गती कमी होते की काय असे वाटू लागले.. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुनबाई, ममता सागर महाउपासिका मीराताई आंबेडकर ,यांनी बौद्ध धम्माची प्रचार व प्रसार करण्याची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून संपूर्ण भारतभर बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करायला सुरुवात केले ..अडीच हजार वर्षांपूर्वी जसे पावसाळ्यामध्ये तथागत भगवान गौतम बुद्ध एकाच ठिकाणी बसून, भिकू संघाला मार्गदर्शन करायचे , मार्गदर्शित झालेला भिकू संघ हा दाही दिशेला बौद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार करायचा ..त्याचीच पुनरावृत्ती भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून आणि मीराताई आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ,भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष भीमराव यशवंत आंबेडकर यांच्या मार्गदर्शनानुसार, संपूर्ण भारत देशामध्ये आषाढी पौर्णिमा ते अश्विनी पौर्णिमा या तीन महिन्याच्या कालखंडामध्ये संपूर्ण भारत देशामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर लिखित, बुद्ध आणि त्यांचा धम्म,, ग्रंथ वाचन सुरू आहे.. प्रत्येक गावात, खेड्यापाड्यात ,गल्लोगल्लीत, तालुक्यात, जिल्ह्यात, राष्ट्रात, फार मोठ्या प्रमाणामध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ, वाचायला सुरुवात झालेली आहे.. त्याचाच एक भाग म्हणून मौजे भीम नगर तालुका वडवणी जिल्हा बीड या ठिकाणी बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ सतत वाचून असंख्य लोकांना बुद्ध तत्त्वज्ञानाकडे वळवण्याचं काम भीम नगर मधील भारतीय बौद्ध महा सभेच्या कार्यकर्त्या त्या उत्साहाने करीत आहेत.. भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष आयुष्यमान प्रकाश तुळशीराम खळगे सर यांनी संपूर्ण तालुक्यामध्ये बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचण्यासाठी तालुक्यातील अनेक गावांना भेटी देऊन प्रत्येक गावागावांमध्ये ग्रंथ वाचण्यासाठी लोकांना प्रभावित केले आहे. तसेच भारतीय बौद्ध महासभेच्या तालुका उपध्यक्ष माननीय,, सौ शीलाताई सुखदेव उजगरे ,संस्कार उपाध्यक्ष श्रीमती अग्री अण्णाभाऊ खळगे, यांच्या सहकार्याने प्रत्येक तालुक्यातील गावांमध्ये ग्रंथाचे वाचन उत्साहामध्ये सुरू आहे.. मौजे भीम नगर या ठिकाणी या ग्रंथ बाचनास फार मोठ्या प्रमाणामध्ये प्रतिसाद मिळत आहे.. अनेक मुला-मुलींना चांगल्या पद्धतीचे वळण लागले आहे .. बौद्ध तत्त्वज्ञानाकडे त्यांचा कल वाढत आहे.. म्हणून वडवणी तालुक्यातील भीम नगर,, तसेच नागवंशी बुद्ध विहार , मौजे पिंपरखेड,, कवडगाव,, देवडी,, खळवट लिमगाव ,,देवळा,,या ठिकाणी,, बौद्धमय वातावरण झाले आहे,, भारतीय बौद्ध महासभेच्या सर्व कार्यकर्त्या या निमित्त सहभागी होतात.. त्यामध्ये वृंदावनी उजगरे ,सागरबाई उजगरे, कलावती बाई उजगरे, सीताबाई जाधव, अनुसयाबाई उजगरे शोभाताई उजगरे, राहीबाई उजगरे, ई. भारतीय बौद्ध महासभेच्या महिला परिश्रम घेतात आणि परिसरातील असंख्य बौद्ध उपासक उपासिका या ग्रंथ श्रवण करण्यास उपस्थित असतात .त्यामुळे वडवणी परिसरातील भीम नगर आणि नागवंशी बुद्ध विहार,तसेच खेड्या पाड्यातील चैतन्याचे वातावरण निर्माण झालेलं आहे.. संपूर्ण तालुक्यामध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# लिंबागणेश केंद्रीय जिल्हा परिषद शाळेत शिक्षक दिन मोठ्या उत्साहात संपन्न

लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आज दि.५ सप्टेंबर गुरुवार रोजी भारताचे राष्ट्रपती, शिक्षणतज्ज्ञ डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन, पहिल्या महिला शिक्षिका,आद्यशिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि थोर समाजसुधारक चक्रधर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे, प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती माधुरी कुलकर्णी यांनी केले तर सुत्रसंचलन अमर पुरी यांनी केले.

शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या आयुष्यावरील माहिती पट उलगडताना त्यांच्या कार्याची महती विशद करण्या बरोबरच महिला हक्क व शिक्षणासाठी महत्वपूर्ण कार्य करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची महती विशद केली. ग्रामस्थांच्या वतीने शाळेतील मुख्याध्यापक आबासाहेब हांगे, सहशिक्षक अमर पुरी,भरत चौरे,संदिपान आगाम,श्रीमती माधुरी कुलकर्णी, सुवर्णा अयाचित यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

शिक्षकदिनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित डॉ.गणेश ढवळे यांनी शिक्षकदिना निमित्त शुभेच्छा देताना जिल्हा प्रशासनाकडून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये चांगले काम करणाऱ्या शिक्षकांना गेल्यावर्षी ११ प्राथमिक व १० माध्यमिक आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले परंतु पुरस्काराचे वितरण रखडलेले असल्याने जिल्हा प्रशासनासाठी हि लाजिरवाणी बाब असुन शिक्षकदिनी गुरूजींना सन्मानापासुन वंचित ठेवण्यात आल्याबद्दल खंत व्यक्त केली.

# लाख रुपये नुकसान भरपाई, शंभर टक्के पीक विमा लागू करा.भाई ड.नारायण गोले पाटील

तालखेड ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा प्रचंड फटका बसलेला असून शेतकऱ्याचे संपूर्ण पिके अतिवृष्टीमुळे गेले असल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असताना कृषी मंत्री पाहणीचे आणि पंचनाम्याचे नाटक करत आहेत, वास्तविक अतिवृष्टीमुळे शेतकरी शंभर टक्के उध्वस्त झालेला असताना शेतकऱ्यांना लाख रुपये नुकसान भरपाई देऊन १००% पीक विमा लागू करण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने माजलगाव तहसीलदार यांना निवेदनाद्वारे केली. आणि शंभर इशारा शेकडो कार्यकर्त्यांनी तहसील समोर प्रचंड घोषणाबाजी केली व शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध केला, शेतकऱ्यांच्या नुकसानीची एकरी लाख रुपये नुकसान भरपाई व १००% पीक विमा लागू न केल्यास




तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती समिती सदस्य भाई ड नारायण गोले पाटील, तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ, भाई चांगदेव शेजुळ, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष अशोक बाप्पा कुलकर्णी, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका चिटणीस भाई आनंत चव्हाण, शेतकरी कामगार पक्षाचे तालुका सहचिटणीस भाई राहुल सोळंके भाई सतीश शेजुळ,भाई राधाकृष्ण पांचाळ, भाई श्रीराम शेवाळे, शेतकरी सभेचे तालुका अध्यक्ष भाई सुदाम चव्हाण, शेतकरी सभेचे तालुका चिटणीस भाई माऊली चंदनशिव, भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण, भाई विष्णू शेळके, भाई भास्कर कांबळे, भाई राजेभाऊ शेरकर आदी उपस्थित होते होते.

# राज्य अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी ॲड. सुभाष राऊत यांची निवड झाल्याचा आम्हाला सार्थ अभिमान - मनोज गुंजाळ

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : राज्याच्या अन्न आयोगाच्या अध्यक्षपदी समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष व प्रसिद्ध व्यवसायिक सुभाष राऊत यांच्याकडे सर्व सुत्रे देण्यात आली आहेत. ड. सुभाष राऊत यांची दोन दिवसांपूर्वीच अन्न आयोगावर सदस्य म्हणून निवड झाली होती. आता त्यांच्याकडे अध्यक्षपदाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे.या पदाला राज्यमंत्री दर्जा आहे.समता परिषदेचे बीड जिल्हा अध्यक्ष तथा प्रदेश उपाध्यक्ष असलेले ड. सुभाष राऊत हे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचे अत्यंत निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात. आता छगन भुजबळ यांच्या शिफारशीवरून त्यांना चार दिवसांपूर्वी अन्न आयोगावर सदस्य म्हणून नियुक्ती देण्यात आली होती. या आयोगाचे अध्यक्षपद रिक्त असल्याने त्यांना या पदाचा पदभार देण्यात आला आहे.या निवडीबद्दल सुभाष राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री छगन भुजबळ, बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे, समीर भुजबळ, पंकज भुजबळ यांचे आभार मानले आहेत. व या पदाचा कोणतेही पद्धतीचा गैरवापर न करता सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. मी आजपर्यंत केलेल्या सामाजिक कार्याची पोच

पावती म्हणून हे पद मला मिळाले आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेने 'एक आपला हक्काचा माणूस'



म्हणून कधीही मला आवाज द्यावा मी जनतेची कामे करण्यासाठी सदैव तत्पर राहणार आहे असेही यावेळी ड. सुभाष राऊत यांनी सांगितले. या निवडीनंतर राष्ट्रपती पुरस्कार विजेते मनोज गुंजाळ व त्यांच्या सहकारी मित्र वैभव घोडके अविनाश गुंजाळ यांच्या वतीने अन्न आयोगाचे नवनिर्वाचित अध्यक्ष ड. सुभाष राऊत यांची भेट घेऊन सत्कार करण्यात आला व त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# लक्ष्मण मच्छिंद्र हजारे या युवकाला न्याय कधी भेटणार

## लक्ष्मण हजारे या युवकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले पत्र

बीड ।प्रतिनिधी

मी लक्ष्मण मच्छिंद हजारे मी राहणार जामखेड ता जि अहमदनगर इथला एक नागरिक आहे , माजी ऐवढीच विनंती आहे कि तुम्ही माज्या पुढच्या कामाला मला तुमची साथ हवी ,इकडे माजी बहीण दोन महिन्या पासून बेपत्ता आहे ,मला आई वडील नाही, मी एक अनाथ बालक आहे ,मला ब्रेन चा आजार आहे मी एकटा राहतो मला माज्या चुलत्या पासून खूप त्रास होतोय, त्यानी माज्या ताई आणि दाजी ला लांब करून आमच्या जमीनीवर त्याचा डोळा आहे आणि नंतर माज्या सख्या भावाला गावाकडे बोलून त्याला पण खाऊ पिऊ काय नाही दिले तर त्याला मग तो पन पैसेन्ट बनला आणि मयत झाला नंतर माज्या वडीलांना दारू मधी विष टाकून मारून टाकले ,मग आता माज्या बहिणी च्या मागे पण लागलेत बहीण चा जबरस्ती करून डिओस करायला लावला



,त्यांच्या लग्नाला १०वर्ष चागले चालत असताना त्याची काय नवरा बायकोत भांडण तर होतच पण चुलता आणि मामा त्यानी जबदस्ती करून त्याना डिओस द्यायला लावला २०१४ला लग्न झाले एक तर माज्या अंगात रक्त नाही ेळी मी ब्रेन च पेशंट आहे. माझी परिस्थिती नाही साहेब माझ्यासारख्या गरिबाला न्याय मिळवून देताना अशी मी आशा बाळगतो. या युवकांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिले आहे

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्व शेतकर्यांना कृषिमंत्री धनंजय मुंडेंचा दिलासा!

## भरपावसात कृषी मंत्री धनंजय मुंडे व विजयसिंह पंडित शेतकर्यांच्या बांधावर

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यात जास्तीचा पाऊस झाल्यामुळे सर्वत्र अतिवृष्टी होवून शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्यामुळे बाधीत शेतकर्यांना थेट मदत करण्यात यावी यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे, असा शब्द कृषी मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिला. कृषी मंत्री धनंजय मुंडे व माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी गेवराई तालुक्यातील लोणाळा, अर्धमसला, तळेवाडी आदी ठिकाणी पीक नुकसानाची पहाणी केली. भरपावसात कृषी मंत्र्यांनी शेतकर्यांच्या बांधावर जावून नुकसानग्रस्तांना दिलासा दिला आहे.

अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या आणि कापुस पिकावरील अकस्मीक मर (पॅरा विल्ट) मुळे त्रस्त असलेल्या शेतकर्यांशी संवाद साधला. तळेवाडी येथे भरपावसात त्यांनी नुकसानग्रस्त शेतीची पाहणी केली.



धनंजय मुंडे म्हणाले, ज्या ठिकाणी २४ तासात अतिवृष्टी झालेली आहे त्या ठिकाणच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची गरज भासत नाही, असा एनडीआरएफचा नियम आहे.

बीड जिल्ह्यातील जवळपास सर्व महसुल मंडळात चोवीस तासात ६५ मिमी. पेक्षा जास्तीचा पाऊस झाल्यामुळे तो भाग अतिवृष्टीखाली येतो त्यामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या शेत जमीनीचे पंचनामे किंवा ई पीक पाहाणी करण्याची गरज न भासू देता अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्व शेतकर्यांना सरसकट थेट शासनाकडुन मदत दिली जावी, याबाबत आपण वरिष्ठांशी चर्चा करणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी सांगितले.

खरडून वाहुन गेलेल्या जमिनी, गाय, म्हैस या सारख्या पशुधनांचा मृत्यू झाला असल्यास अशा घटनांच्या बाबतीत पंचनाम्यांची गरज भासणार आहे. असे पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासकीय यंत्रणेला दिलेले आहेत. अतिवृष्टीचे मोठे संकट निर्माण झाले आहे, यातुन शेतकर्यांना दिलासा देण्याचे काम महायुती सरकार करत आहे.

थकीत पीक विम्याच्या संदर्भात त्यांनी गेवराई येथे अधिकार्यांना कृषी विभागाने सुनावणी घेवून मान्य केलेल्या गेवराई तालुक्यातील २५ हजार २२१ शेतकर्यांना तत्काळ पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याचे निर्देश दिले आहेत. कृषी मंत्र्यांच्या दौर्यामुळे नुकसानग्रस्त शेतकर्यांना दिलासा मिळाल्याची भावना बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केली.

# एस टी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तत्काळ उपाययोजना करा – गणेश बजगुडे पाटील

## इंटकच्या (राष्ट्रीय मजदूर काँग्रेस) वतीने एसटी महामंडळ संपला पाठिंबा– रामधन जमाले



**बीड ।प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (एस.टी) कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासाठी दि.०३/०९/२०२४ पासुन सुरु असलेल्या आंदोलनास भारतीय राष्ट्रीय काँग्रेस प्रणित इंटक कामगार संघटनेच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. यावेळी बोलताना काँग्रेस पक्षाचे बीड तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे म्हणाले की, १०/१२ तास काम करून देखील एसटी कर्मचार्यांना राज्य शासकीय कर्मचारी यांच्याप्रमाणे वेतन वाढ मिळत नाही, महागाई भत्ता फरक बिल मिळात नाही.**

एकीकडे रोज नवनवीन योजना काढून सरकार राज्यातील जनतेची दिशाभूल करत आहे मात्र रात्रनदिवस मेहनत करून एसटी कामगाराणा स्वतःच्या न्याय मागण्यासाठी आंदोलन करावे लागते ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. बीड तालुका काँग्रेस कमिटी व इंटक कामगार संघटना आपल्या सोबत असुन शासनाने आपल्या मागण्यांवर तत्काळ उपाययोजना कराव्यात असेही ते म्हणाले. यावेळी पाठिंब्याचे पत्र एस टी कर्मचारी कृती समितीचे महादेव खांडे, संतोष गणगे, कल्याण जाधव, बाबा डोळस, अरविंद इंगोले, नवनाथ टाकले, यांच्याकडे देण्यात आले. यापत्रावर काँग्रेस पक्षाचे बीड तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील, इंटकचे जिल्हाध्यक्ष रामधन रानबा जमाले, उपाध्यक्ष संदीप झिंजुर्के, सचिव सखाराम बेंगडे, दयानंद धुरंधरे, सुदाम भोपळे आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# माजी सैनिकाचा मुलगा गोविंद मुंडे एमबीबीएस प्रवेशासाठी ठरला पात्र

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

तालुक्यातील चोंडी येथील माजी सैनिक विनायक माणिकराव मुंडे यांचा मुलगा गोविंद विनायक मुंडे हा एमबीबीएस परीक्षेसाठी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय अकोला येथे पात्र झाला आहे. गोविंद मुंडे यांचे प्राथमिक शिक्षण पहिली ते चौथी जिल्हा परिषद शाळा चौंडी येथे तर व पाचवी ते दहावी न्यू हायस्कूल टिपीएस-परळी येथे झाले. तर महाविद्यालयीन शिक्षण वैद्यनाथ कॉलेज परळी येथे झाले आहे. गोंविद विनायक मुंडे याने नीट परिक्षेत प्राविण्य यश



मिळवत एमबीबीएससाठी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय अकोला येथे पात्र झाला असून त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र त्याचे अभिनंदन व कौतूक होत आहे.

# गेवराईत दहीहंडी फोडणाऱ्या पैठणच्या राजे संभाजी मंडळाला शितलताईंच्या हस्ते बक्षीस वितरण!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : शहरात गेल्या काही वर्षांपासून बंद असलेला दहीहंडी उत्सव पुन्हा धोंडराई येथील सरपंच शितल साखरे यांच्या संकल्पनेतून दहिहंडी उत्सव ३ सप्टेंबर रोजी प्रेक्षकांच्या उपस्थितीत झाला. दहीहंडी फोडणाऱ्या पैठणच्या राजे संभाजी मंडळाला शितलताईंच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले आहे अशी माहिती आयोजित शिष्टमंडळाने यांनी दिली आहे.गेवराई शहरातील मुख्य वस्तीत असलेल्या बाजार तळावर दहीहंडी उत्सव मोठ्या थाटात पार पडत असताना दहीहंडी फोडणाऱ्या विजेता संघाला बक्षीस न दिल्यांची चर्चा असल्याची, किंवा आयोजकांची चमकेगिरी, कार्यक्रमाचा फज्जा उडाला हेडलाईन वरून अशी बातमी वृत्तपत्रात छापून आली मात्र प्रथमच मोठा आयोजित कार्यक्रम केल्याने थोडासा गोंधळ उडणार आणि पहिल्या वेळेस कार्यक्रम घ्यायला म्हणलं की कोणी तरी नाराज होणार कोणाच तरी नाव घ्यायचे राहिलं म्हणून ते नाराज कोणाला तरी मान पान द्यायचा विसरलो म्हणून ते नाराज अश्यात काय होतं येवढा मोठा कार्यक्रम घेतला आणि छोट्या- छोट्या गोष्टी साठी आपले माणसं नाराज होणार आणि आपले मानसं नाराज झाले की कार्यक्रम केलेला सुख भेटत नाही म्हणाल तरी वावग ठरणार नाही असंच झाल , थोडस चुकणार , काही तरी विसरणार , कारण ना आपल्या कडे ना यंत्रणा असते ना आपल्या कडे काम करायला मानसं असतात. पैठण चे राजे संभाजी क्रीडा मंडळ नवीन कवसान , चा संघ नाराज झाला मानाची सलामी त्यांना दिली , त्यांना त्यांचा मान द्यायचा आम्ही गोंधळ गोंधळात विसरलो , दुसऱ्या गावातून संघ आपल्या साठी आलेले असतात , त्यांची नाराजगी साहजिक होती , ते आम्हाला जाणवल म्हणून त्यांना कार्यक्रम झाल्यावर आमची ही



पहिलीच वेळ आहे , आणि त्यांनी ही संभाळून घेतलें व काही राजकारणी किडे जे काही लोकांच्या डोक्यात काहीही घालायचा प्रयत्न करतात आणि तो प्रकार झाला ही , जे गैरसमज पसरवून देतात , चांगल्या झालेल्या कार्यक्रमात कुठे तरी चुका शोधत बसायचं आणि बदनामी करायची, समाजातील लोकांच्या मनात गैरसमज निर्माण करायचा प्रयत्न केला जात असल्याचे सरपंच शितल साखरे यांनी फेसबुक वर ट्विट करून सांगितले.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT